# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

**४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.**

फॅक्स २५६५६२३४ **Email : ropune.dte@gmail.com Web Site : - www.ropune.org.in**


**स्मरणपत्र**

जा.क्र. विकापु/संगणक/२०११/६७९१ दिनाक – ०६/०८/२०११

प्रति,
सर्व शासकीय /अनुदानित/विनाअनुदानित
पदव्युत्तर पदवी/पदवी/पदविका संस्था
पुणे विभाग

**विषय** :- **सांखिकी माहिती तपासून अद्ययावत करण्याबाबत.**

संदर्भ :- १)मा.संचालक, तं.शि.सं., मुंबई यांचे पत्र क्र.३/तंशिस/सांखिकी/२०११/४७ दि.९/३/११
२) या कार्यालयाचे पत्र क्रमांक विकापु/संगणक/२०११/ १७७९ दिनांक ११/०३/२०११
३) या कार्यालयाच्या दिनांक २७/०७/२०११ रोजी संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आलेले सांखिकी माहिती तपासुन अद्ययावत करण्याबाबतचे परिपत्रक

उपरोक्त विषयान्वये सर्व संस्थाना सुचीत करण्यात येते की मा. संचालकांच्या संकेतस्थळावरील सांखिकी माहिती संस्थेच्या login द्वारे भरतांना ब-याच चुका करण्यात आलेल्या आहेत. संस्थानी माहिती भरतांना Enrollment मध्ये संबंधीत संस्थेत **प्रथम वर्ष ते शेवटचे वर्ष या मध्ये प्रवेशीत सर्व विदयार्थ्यांची संख्या टाकणे गरजेचे होते परंतू संस्थानी फक्त प्रथम वर्षाचीच माहिती भरलेली आहे**. तसेच इतर पण कॉलम भरलेले नाहीत. संबंधीत माहिती शासनामार्फत देय असलेल्या सवलती (समाजकल्याण,इ.बी.सी.,अल्पसंख्यांक) साठी लागणारी रक्कम ठरवतांना शासनास मदत होते त्यामुळे login द्वारे भरलेली माहिती **अचुक** असणे अर्त्यंत आवश्यक आहे.

प्रत्येक संस्थेच्या login मध्ये २००७-०८ ते २०१०-२०११ पर्यंतच्या माहितीचा तुलनात्मक तक्ता उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या कार्यालयाचे पत्र क्रमांक विकापु/संगणक/२०११/ १७७९ दिनांक ११/०३/२०११ द्वारे सदरची माहिती **तपासुन अद्ययावत करण्याबाबत** सुचीत करण्यात आले होते. तसेच या कार्यालयाच्या दिनांक २७/०७/२०११ रोजी संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आलेल्या सांखिकी माहिती तपासुन अद्ययावत करण्याबाबतचे परिपत्रका व्दारे प्रत्येक संस्थेच्या माहितीमध्ये असणारी त्रुटींची यादी प्रदर्शित करण्यात आलेली आहे. व_सदरची माहिती तपासुन अद्ययावत

करण्याबाबत सुचीत करण्यात आले होते. तथापी ब-याच संस्थांनी या बाबत काहीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही ही बाब खेदजनक असून या बाबत वरीष्ठ कार्यालयाकडून वांरवार विचारणा होत आहे.

तरी ज्या संस्था सांख्यीकी माहिती तपासुन अद्ययावत करणार नाहीत अशा संस्थांची थेट व्दितीय वर्षा करीताची रिक्त जागांची माहिती या कार्यालयाव्दारे तसेच संचालनालयाव्दारे कर्न्फम केली जाणार नाही तसेच गुणवत्तायादी ही तपासली जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी

आपणास पुन्हा सुचीत करण्यात येते की उपरोक्त माहिती ही तात्काळ आपल्या संस्थेच्या लॉगईन मधून दुरुस्त करुन त्याचा अहवाल या कार्यालयास दिनांक १०/०८/२०११ पर्यंत या कार्यालयास सादर करावा तसेच त्याची प्रत थेट व्दितीय वर्ष रिक्त जागांची माहिती सादर करतेवेळी येताना घेंवून यावी.

(डी एन शिंगाडे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

प्रत :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.